शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक २० वा जुलै २०१४
त्रैमासिक क्र. ३
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : 41 अंक : 20 कोल्हापूर ता. .... एप्रिल 2014 किंमत दोन रुपये Reg. No. GR/RNP/KLP 136/09-11 Posted in Kolhapur RMS

## वसंतोत्सव २०१४
## कल्याण -डोंबिवली विभाग

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या कल्याण-डोंबिवली महिला विभागातर्फे 'वसंतोत्सव' कार्यक्रम दिनांक २० एप्रिल २०१४ रोजी देवरूखे ब्राह्मण संघ, डोंबिवली (पूर्व) येथे सायंकाळी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला ५५-६० महिला, पुरुषांची उपस्थिती होती. चैत्रगौरीची पूजा व आरती नंतर प्रथेप्रमाणे कार्यक्रमाची सुरुवात कुमारी कृतिका भिडे हिच्या गणेश वंदनेने झाली. त्यानंतर देवीची आराधना, भिडे माहेरवाशिणी आणि सासुरवाशिणी यांनी श्रीसूक्त सादर करून केली. वसंत ऋतू आणि चैत्रगौरी विषयी माहिती सौ. योगिनी पोंक्षे यांनी सादर केली. ठाणे महिला विभागातर्फे सौ. अपर्णा भिडे यांनी पाठविलेल्या 'चैत्रांगण' या चैत्र महिन्यातील रांगोळी विषयीची माहिती सौ. पूर्वा देवधर यांनी वाचून दाखवली.



भिड्यांच्या लेकी, सूना व माहेरवाशिणी यांनी या कार्यक्रमात आपली कला सादर करून महिला विभागाला एक पाऊल पुढे टाकायला मदत केली. सौ. वैशाली भिडे यांनी देवीचा जागर, कुमारी रचना भिडे व कुमारी ऋजुता दातार यांनी राधाकृष्णावर सुंदर नृत्य सादर केले. सौ. सीमा भिडे व सौ. रेखा भिडे तसेच अनेक भिडे महिलांनी गाणी व स्वरचित कविता सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. सौ. अलका भिडे यांनी स्त्रीशक्ती विषयी माहिती वाचून दाखवली तसेच भिडे महिला, माहेरवाशिणी ज्या स्वतंत्र व्यवसाय करतात, त्यांनी आपल्या व्यवसायाची थोडक्यात माहिती दिली. यानंतर सर्वांनी डाळ-पन्हे याचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. गौरी भिडे यांनी केले. सौ. विद्या भिडे यांच्या आभारप्रदर्शनानंतर सौ. सीमा भिडे यांच्या सुरेल पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. भिडे कुलबंधूसुद्धा या कार्यक्रमात सहभागी झाले होते. या सर्व कार्यक्रमाचे नियोजन सौ. गौरी, विद्या, अलका, रंजना, मिनल, धनश्री, सीमा, कुमारी कोमल या सर्व भिडे महिलांनी केले. भिडे कुटुंबियांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून वसंतोत्सव कार्यक्रमाचा आनंद लुटला.

श्री. प्रदीप भिडे, डोंबिवली
मो.- ९८९२५०४०४२

## उत्सव चैत्रांगणाचा - ठाणे

दोन वर्षापूर्वी दोन छोटेसे कार्यक्रम 'आम्ही भिडे' मंडळींनी ठाणे येथे केले. २०१४ उजाडले. हाती 'आम्ही भिडे' चा अंक आला. आणि माझे आळसावलेले मन पुन्हा चैत्रपालवीने फुलले. सौ. सुषमा यांनाही त्याचवेळी स्फूर्ती आली. दोघी भेटलो आणि 'उत्सव चैत्रांगणाचा' या नावाखाली 'राजदीप-ठाणे' येथे पुन्हा भेटू या असे ठरवून भिडे प्रतिष्ठान महिला शाखेला कळवून कार्यक्रम ठरविला. महिला शाखेच्या सदस्य सौ. अलका (अॅड.) व दादरच्या सौ. संपदा यांचा उत्साह प्रचंडच !



सौ. अपर्णा यांनी भिडे मंडळींना फोन करून दि. १९ एप्रिलला २० जण सौ. अपर्णा' यांचे घरी जमले. तीन माहेरवाशिणी १० वर्षाची अनुष्का आणि नुकतीच नोकरी लागलेली ऋचा उत्साहाने सहभागी झाल्या. साऱ्यांच्या स्वागताला दाराशी चैत्रांगण आणि फुललेले कमळ होते. घरात शिरल्यावर लक्ष वेधून घेणारी हिरव्या रंगात सजलेली, डोलाऱ्यात बसलेली गौर होती. नव्या चैत्रपालवीचे प्रतिक म्हणून गौरीभोवती पानांची आरास. एका बाजूला काही बाहुल्या

मांडल्या होत्या. सौ. अपर्णा यांनी बाजूला मांडलेल्या बाहुल्यांची कथा सांगितली. 'आदिशक्ती किंवा स्त्री' या नावाचा अर्थ काय ह्याबद्दल माहिती दिली.

यानंतर आंबेडाळ आणि पन्हे याचा आस्वाद सर्वांनी घेतला. त्यानंतर ओळखीचा कार्यक्रम झाला. श्री. व्यंकटेश यांनी त्यांचे अनुभव सांगितले. ते 'भिडे कुलवृत्तांता'चे काम करणाऱ्या आघाडीच्या सैनिकांमधले एक. त्यामुळे त्यांच्याजवळ अनुभव भरपूर. त्यानंतर 'आदिशक्ती' या सौ. अपर्णा यांच्या कार्यक्रमाचे अनुषंगाने 'गर्भसंस्कार' या विषयावर चर्चा आणि अधिक माहितीची देवाण घेवाण झाली. कै. पू. माई कर्वे यांच्या द्वारकाधीशाच्या संकल्पनेवर चर्चा झाली. पुन्हा भेटण्याचे आश्वासन सर्वांनी दिले. त्यानंतर पारंपारिक सुगंधी सोहळा होऊन सर्व मंडळी आता पुन्हा केव्हा भेटायचे ? असा प्रश्न विचारून घरी परतली.

सौ. अपर्णा उमेश भिडे, ठाणे
मो.- ९३२२८५४२८३

## वासंतिक मेळावा - पुणे

चैत्र महिना म्हणजे रंग-गंधाची उधळण. वसंत ऋतुचे आगमन. तृतीयेला घरोघरी कौतुकाने गौर बसवली जाते. हे निमित्त साधून पुण्यात कुलभगिनी व माहेरवाशिणी यांनी भेटायचे ठरविले. १३ एप्रिलला सौ. प्रियाच्या घरी कार्यक्रमाचे आयोजन केले. पुण्यातील शशीताई, जयश्रीताई, प्रतिभाताई, माया, योगिनी, प्रिया, शर्मिला, अनिता यांचा प्रमुख सहभाग होता. मुंबईहून मी, अलका व अंजली गेलो होतो. सांघिक कार्य ही कामाची पद्धत ठेवल्यामुळे प्रत्येकीने कामे



वाटून घेतली. गौरीची आरास, कमलाकृती संगमरवरी दगडीत पाणी घालून, त्यामध्ये झोपाळ्यावर चैत्रगौर मांडून भोवती मोगरा, मदनबाण, चाफा इत्यादी फुलांचा दरवळ सगळ्यांनाच प्रसन्न करून गेला. चैत्रगौरीची आरती करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे इथे सगळ्याजणी नुसत्या भेटल्या नाहीत तर प्रत्येकीने प्रत्येकीला जाणून घेतले. आपले समाजासाठी योगदान याविषयी प्रत्येकाने दोन मिनिटे बोलावे असा विचार प्रियाने मांडला होता. या कार्यक्रमामुळे आपल्यातील अनेकांचे सुंदर पैलू व जीवन विषयक दृष्टी, समाजासाठी, कुटुंबासाठी धडपडण्याची वृत्ती याची माहिती मिळाली. पूर्वा देवधरने कुलभगिनींसाठी पाठवलेला संदेश प्रियाने वाचून दाखविला.

प्रतिष्ठानच्या जमलेल्या वर्गणीतुनच आपण कार्यक्रम करतो. तरीसुद्धा जमलेली सर्व वर्गणी प्रतिष्ठानकडे जमा व्हावी ह्या हेतूने आयोजक मुख्य महिलांनी भोजनासाठी असलेले सर्व पदार्थ प्रत्येकीने आपापल्या घरून करून आणल्यामुळे भोजनाला रुची शिवाय स्नेह व आपुलकीचा ओलावा असल्यामुळे भोजन अधिक रूचकर झाले. भोजनोत्तर गाणी, विडंबन, काव्य, उखाणे असा एक तासाचा कार्यक्रम होऊन सर्वांनी भरभरून आनंद लुटला. वर्षातून किमान ३ ते ४ वेळा तरी असे कार्यक्रम प्रत्येक विभागात, प्रत्येक शहरात, गावामध्ये व्हावे असे वाटते. या कार्यक्रमासाठी सर्वश्री ले.क.सुनील, माधव, दिलीप, विनायक भिडे यांनी नेहमीप्रमाणे मदत केली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. योगिनी यांनी केले.

सौ. संपदा भिडे, मुंबई
मो.- ९८१९९५१३९१

## प्रतिष्ठानचे पुरस्कार - २०१५

२०१५ मध्ये संपन्न होणाऱ्या भिडे कुल संमेलनात पुरस्कृत असलेले खालील पुरस्कार देण्यात येतील त्याकरिता खाली दिलेल्या निकषानुसार आपले नामांकन खालील पत्त्यावर फोटोसह पाठवावेत.

**१) साहस/क्रीडा पुरस्कार** : भिडे कुटुंबातील साहसीवृत्तीच्या किंवा क्रीडा क्षेत्रामध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो.

**२) माझी आई पुरस्कार** : भिडे कुलोत्पन्नातील गृहिणी, जेष्ठ स्त्री असावी तसेच अल्प उत्पन्न आणि प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन मुलांकरिता किंवा स्वत:च्या कुटुंबाकरिता विशेष कार्य करणारी.

**३) कला पुरस्कार** : संगीत, नाटक, सिनेमा किंवा इतर कलेच्या क्षेत्रात चमकदार कामगिरी करणाऱ्या खास भिडे व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो.

**४) आपली सून पुरस्कार** : घरातील स्त्रीमुळेच संस्काराची ठेव एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत जाते. हा संस्काराचा वारसा पिढ्यानपिढ्या सुरू राहतो. अशा कार्याला कारण ठरलेल्या भिडे कुटुंबातील सुनेचा गौरव व्हावा यासाठी समाजकार्यात अग्रेसर असणारी, आध्यात्मिक क्षेत्रात प्रचार कार्य करणारी, प्रतिकूल परिस्थितीत मुलांसाठी वा कुटुंबासाठी विशेष कार्य करणारी

**५) उद्योजक पुरस्कार** : लघुउद्योजक किंवा नव्याने व्यवसायास सुरूवात केलेला, धडाडीने कष्टाने, प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा नेटाने व्यवसाय वृद्धी करणाऱ्या तरुण भिडे व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो.

पत्रव्यवहारासाठी पत्ता : ले.क. सुनिल वासुदेव भिडे, १४२६, सदाशिव पेठ, निलसदन ए-२०१, पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०.

## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, मुंबई

(ई-२०१४० (मुंबई) दि. १६ एप्रिल २००२)

## वार्षिक सभेची सूचना

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या सभासदांची चौदावी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १२ ऑक्टोबर २०१४ रोजी सायंकाळी ४.३० वाजता खालील ठिकाणी भरेल. सर्व सदस्य भिडे कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणींनी सभेला हजर राहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय :**

१) स्वागत व प्रास्ताविक

२) तेराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त वाचन व मान्यता

३) वार्षिक अहवाल आणि ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या वर्षाच्या हिशोबपत्रकांना मान्यता.

४) सन २०१४-१५ वर्षासाठी हिशोब तपासनिसाची नेमणूक.

५) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे अन्य विषय

**विशेष सूचना :** १) गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी वरील कामकाजासाठी अर्ध्या तासाने सुरू होईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही. २) सभासदांना काही प्रस्ताव सूचना, स्पष्टीकरण इ. आवश्यक असेल तर त्यासंबंधी त्यांनी लेखी स्वरूपात दि. २६ सप्टेंबर २०१४ पर्यंत प्रतिष्ठानच्या पुणे कार्यालयात विचारणा करावी त्यामुळे आवश्यक ती माहिती सभेच्यावेळी तयार ठेवता येईल.

कार्यकारिणीच्या आदेशान्वये

**प्रभाकर शं. भिडे, चिटणीस**

**सभेचे स्थळ :** श्री. सुनिल भिडे, २१ हारमोनी, लेन नं. ४बी, पी.वाय्.सी. ग्राऊंडसमोर, डॉ. दि. ब. देवधर मार्ग, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४. मोबाईल : ९६५७५४१२३६


**आम्ही भिडे अंक २० वा**

**संपादक :** श्री. शशिकुमार केशव भिडे

**कार्यकारी संपादक :** श्री. प्रभाकर शंकर भिडे

**संपादक मंडळ :** ले.क. सुनील भिडे, श्री. दिलीप भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. विलास भिडे, सौ. प्रिया भिडे, सौ. संपदा भिडे, श्री. विजय अ. भिडे, सौ. पूर्वा देवधर, सौ. प्रीती प्र. भिडे

**सल्लागार मंडळ :** श्री. सुनील भिडे (अभिरूची), शशिताई घुले, श्री. प्रभाकर वा. भिडे, श्री. के. मो. भिडे

**अक्षर जुळणी :** रविंद्र पाटणकर


## – संपादकीय –

'आम्ही भिडे' अंकाबद्दल वाचकांच्या प्रतिक्रिया येतात. अंक चांगला व वाचनीय आहे, वर्गणी किती आहे, अंक विनामूल्य असुनसुद्धा खर्चाचा ताळमेळ कसा ठेवता. त्या शिवाय भिड्यांव्यतिरिक्त इतर आडनावांच्या व्यक्तींकडूनही देणगी, सभासदत्व ह्या बाबतीत चढता आलेख बघता प्रतिष्ठानच्या व्यवहारातील पारदर्शकता, नेटवर्क ह्याबाबत कौतुक होत असते. खरेतर आपलीच झालेली स्तुती आपणच सांगायची हे आपल्या भिड्यांच्या स्वभावात नाही. परंतु वाचकांसमोर ही बाब प्रदर्शित करण्यात वावगे आहे असे वाटत नाही. ह्या शिवाय भिडे प्रतिष्ठान हे भिड्यांनी, भिड्यांसाठी सुरू केलेले असल्यामुळे हे सर्वांचेच यश आहे म्हणून ही बाब आपल्यासमोर मांडतो. आपला अंक ह्यापेक्षाही अधिक उंचीवर नेण्याकरिता आणि वाचकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपल्याकडूनच सहकार्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आपले योगदान महत्वाचे ठरते. म्हणून पुढील अंकामध्ये 'आठवणीतील माझे गांव' आणि 'रम्य ते बालपण' ह्या विषयावर आपल्याकडे काही आठवणी, फोटो, संदर्भ, गोड व कटु क्षण देतांना सुवाच्च अक्षरात, शब्दमर्यादा शक्यतो २०० ते २५० शब्दांपर्यंत असावी, सोबत आपला फोटो असल्यास पाठवावा. लेख पाठवितांना प्रतिष्ठानच्या ई-मेल वर office@bhidekul.in किंवा dilip.bhide15@gmail.com ह्यावर पाठवावेत अन्यथा प्रतिष्ठानच्या पत्रव्यवहारासाठी दिलेल्या पत्त्यावर जरुर पाठवावेत.


## 'दि अपूर्व ग्रुप टूर्स'चा श्री गणेशा

पर्यटनासाठी पर्यटकांसाठी स्नेहाची सहल

## मध्यप्रदेश

- मैत्रीपूर्ण सहवास
- शाकाहारी भोजन व निवास व्यवस्था
- रेल्वे व बसचा प्रवास

**दिनांक २० नोव्हेंबर पासून १३ दिवसाची सहल (बुकींग सुरू)**

प्रत्येकी १३०००/- रुपये

खजुराहो/पचमढी/भेडाघाट/कान्हा/जबलपूर/मंडु/उज्जैन/इंदौर

– संपर्क –

सौ. वर्षा दिलीप भिडे,

मो. : ९७६३०७९१३१ किंवा ९६५७५४१२३६

● मर्यादित जागा असल्यामुळे तसेच रेल्वे व बसचे बुकींगच्या दृष्टीने १५ सप्टेंबर २०१४ पर्यंत बुकींग होणे आवश्यक

## भिडे प्रतिष्ठान तर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### जुलै

१) श्री.मुकुंद कृष्ण भिडे, बेळगांव १
२) श्री. शशीकुमार के. भिडे, पुणे २
३) श्री. विवेक वसंत भिडे, रत्नागिरी २
४) श्री. समीर सुधीर भिडे, ठाणे ५
५) श्री. रामचंद्र काशीनाथ भिडे, कल्याण ७
६) श्री. विमल रघुनाथ घाणेकर, पुणे ८
७) श्री. वसंत सदाशिव भिडे, बोरिवली १५
८) सौ. अंजली कुलकर्णी, मुंबई १५
९) सौ. सुनंदा दिलीप भिडे, मुंबई १६
१०) श्री. वासुदेव परशुराम भिडे, डोंबिवली १७
११) श्री. अनिल वामन भिडे, पुणे १७
१२) श्री. अशोक पुरुषोत्तम भिडे, पनवेल २०
१३) सौ. अस्मिता प्रवीण भिडे, गोवा २२
१४) श्री. प्रभाकर शंकर भिडे, डोंबिवली २२
१५) कु. दिपांकीता सुनील भिडे, पुणे २३
१६) श्री. बळवंत भिडे, संगमनेर २३
१७) श्री. अरविंद विद्याधर भिडे, पुणे २३
१८) श्री. विजय विष्णू भिडे, पुणे २४
१९) सौ. स्मिता सतिष भिडे, मुंबई २७
२०) श्री. शंकर त्रिंबक भिडे, पुणे २८
२१) श्री. तेजस श्रीकृष्ण भिडे, मालाड ३०
२२) सौ. अनुराधा अविनाश भिडे, मिरज ३०

### ऑगस्ट

१) सौ. मीरा मधुकर भिडे, गुजराथ ३
२) श्री. विद्याधर वासुदेव भिडे, पुणे ५
३) कु. सुबोध श्रीकांत भिडे, रोहा ६
४) श्री. श्रीकृष्ण रघुनाथ भिडे, पुणे ६
५) सौ. योगीनी माधव भिडे, पुणे ७
६) श्री. ओंकार मिलींद भिडे, पुणे १०
७) सौ. शिल्पा महेश जोशी, मुंबई ११
८) श्री. अमित दिलीप भिडे, पुणे १२
९) श्री. राजेन्द्र महादेव भिडे, दादर १३
१०) सौ. प्रसन्ना सुभाषचंद्र भिडे, पुणे १४
११) कु. ऋता चिंतामणी भिडे, ठाणे १५
१२) ले. क. सुनील वासुदेव भिडे, पुणे १५
१३) श्री. मिलींद पुरुषोत्तम भिडे, पुणे १८
१४) डॉ. संदीप दत्तात्रय भिडे, गुजराथ १९
१५) सौ. सुजाता प्रदीप भिडे, पुणे २१
१६) श्री. माधव पुरुषोत्तम भिडे, पुणे २१
१७) सौ. वंदना विवेक भिडे, दिल्ली २१
१८) सौ. विद्या विश्वनाथ भिडे, पुणे २२
१९) श्री. निलेश अशोक भिडे, पनवेल २६
२०) श्री. विवेक विजय भिडे, दिल्ली २६
२१) श्री. विनायक सखाराम भिडे, डोंबिवली २७
२२) श्री. विजय रघुनाथ भिडे, ठाणे २८
२३) सौ. शर्वरी शिरीष शेवाळकर, पुणे ३०
२४) श्री. गोपाळ अनंत भिडे, किहीम ३१
२५) श्री. गोविंद काशीनाथ भिडे, सोलापूर ३१

### सप्टेंबर

१) कु. सुरभी राजेन्द्र भिडे, डोंबिवली १
२) श्री. केदार प्रभाकर भिडे, डोंबिवली २
३) श्री. प्रसाद वसंत भिडे, ठाणे ३
४) सौ. वैजयंती रामचंद्र भिडे, कल्याण ३
५) कु. विश्वश मुकुंद भिडे, बेळगांव ४
६) सौ. आरती अनंत भिडे, चिपळूण ७
७) श्रीमती संध्या त्रिंबक भिडे, पुणे ७
८) सौ. अनुराधा गोविंद भिडे, सोलापूर ९
९) श्री. अमित अरविंद भिडे, पुणे १०
१०) कु. बागेश्री अविनाश भिडे, पुणे १०
११) श्रीमती शशी मुरलीधर घुले, पुणे ११
१२) श्री. अनंत शरद भिडे, चिपळूण १२
१३) श्री. प्रविण भिकाजी भिडे, गोवा १३
१४) श्री. श्रीराम श्रीपाद भिडे, चिपळूण १५
१५) श्री. आनंद भिडे, मुंबई १६
१६) सौ. कल्पना विनायक भिडे, धुळे १८
१७) कु. प्रसाद केदार भिडे, डोंबिवली १८
१८) श्री. विनायक विश्वनाथ भिडे, पुणे १८
१९) कु. रचना नितीन भिडे, डोंबिवली १९
२०) श्रीमती ललीता र. केसकर २०
२१) श्री. योगेश प्रभाकर भिडे, डोंबिवली २१
२२) सौ. रेणूका केदार भिडे, पुणे २२
२३) श्रीमती वैशाली विलास भिडे, हैद्राबाद २५
२४) कु. सारंग संतोष भिडे, ठाणे २६
२५) कॅ. विवेक प्रभाकर भिडे, मुंबई २६
२६) श्री. राहित विजय भिडे, ठाणे २७
२७) सौ. अपर्णा सुहास भिडे, सातारा २९
२८) श्री. बल्लाळ श्रीधर भिडे, चिपळूण २९
२९) श्री. सुधीर गणेश भिडे, ठाणे २९

## *एप्रिल २०१४ ते जून २०१४ पर्यंतचे देणगीदार*

१) श्री. प्रदीप वासुदेव भिडे व
डॉ. शीला प्रदीप भिडे, दिल्ली रु. १०,००,०००/- शैक्षणिक निधी
२) श्री. अरविंद भिडे, कल्याण रु. १००००/- देणगी
३) श्री. श्रीधर रामचंद्र भिडे, चिपळूण रु. २५००/- देणगी
४) श्रीमती विमल रघुनाथ भिडे, पुणे रु. २०००/- देणगी
५) श्री. मधुकर भिडे, बडोदा, गुजरात रु. १००१/- देणगी
६) श्री. अरविंद श्रीपाद भिडे, पुणे रु. १०००/- वाढदिवस देणगी
७) श्री. रविंद्र विनायक भिडे, मुंबई रु. ९००/- आजीव सभासद
८) श्री. अनिल सुरेश भिडे, पुणे रु. ९००/- आजीव सभासद
९) श्री. अनिल महादेव भिडे, भोपाळ रु. ९००/- आजीव सभासद
१०) श्री. रमेश एम्. भिडे, डोंबिवली रु. ९००/- आजीव सभासद
११) सौ. श्रद्धा व्ही. भिडे, डोंबिवली रु. १०००/- आजीव सभासद
१२) श्री. प्रभाकर रामचंद्र भिडे, सांगली रु. ५००/- देणगी
१३) सौ. रजनी मोरेश्वर करंदीकर, श्रीरामपूर रु. ५००/- देणगी

### नम्र सूचना

ज्या कुलबंधु/भगिनींना/माहेरवाशिणींना आम्ही भिडेचा अंक मिळत नाही अथवा प्रतिष्ठानकडून कोणताही पत्रव्यवहार होत नाही त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधून आपला पत्ता व फोन नंबर कळवावा. तसेच अंक दोनदा मिळत असेल त्यांनी त्वरीत कळवावे.

दिलीप भिडे, पुणे - ९६५७५४१२३६,
ले.क.सुनील भिडे, पुणे - ९६२३०१७४४,
अजय भिडे, मुंबई - ९९६९५४४७२४,
प्रदीप भिडे, डोंबिवली - ९८९२५०४०४२

# आठवणीतील पुण्यातील गणेशोत्सव

श्री. केशव मो. भिडे, पुणे
मो. - ९८८१२०१९३०

पुणे शहराचा लौकिक केवळ भारतात नव्हे तर परदेशातही आहे याचा प्रत्यय मला जर्मनीतही आला. तेथे एक जर्मन भेटला. त्यानी मी पुण्याचा आहे असे समजल्यावर 'गणेश फेस्टिव्हल' विषयी चौकशी केली. ते समजून मला मी पुणेकर असल्याचा अभिमान वाटला. 'आपल्या राजकीय चळवळीला धर्माचा पाठिंबा असला म्हणजे चांगला' असा दूरदृष्टीचा विचार करून लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची संकल्पना मांडली एवढेच नव्हे तर त्यांच्या हयातीत गणेशोत्सव सर्व महाराष्ट्रभर फोफावला. १८९३-९४ मध्ये पुण्यात सुरू झालेल्या गणेशोत्सवातल्या काळात न्या. रानडे, ना. गोखले अशा सनातनी, सुधारक मंडळींनी प्रथम थोडासा विरोध दर्शविला पण सामाजिक रेट्यापुढे त्यांचे चालले नाही.

माझ्या लहानपणी म्हणजे १९४५-४६ च्या सुमारास गणेशोत्सव अतिशय उत्साहाने साजरा होत असे. चौकातून, आळीमध्ये मांडवाचे काम चालू होई. मंडई, शनिवार वाड्याचे मैदान, कुंभारआळीमध्ये गणपतींच्या मूर्ती विक्रीसाठी ठेवल्या जात. घरच्या पूजेत मातीची, चारी हात सुट्टे असलेली मूर्ती आणली जाई. दीड दिवसाचा पाच दिवसांचा गणपती, तसेच गौरी गणपतींचे बरोबर विसर्जन असे. पहिल्या दिवशी सार्वजनिक गणपतीची संध्याकाळपर्यंत प्रतिष्ठापना होत असे. बँड, चौघडे यांच्याबरोबर 'गणपती बाप्पा मोरया' अशा घोषणा देत मिरवणूक निघे. वडीलधारी मंडळींच्या आज्ञेत मिरवणूक निघत असे. मंडईचा गणपती सध्या ज्या जागेवर बसतो त्याच जागेवर बसत असे. फरक इतकाच की त्यावेळी तेथे मोकळे मैदान होते. पंतसचिवांच्या पिछाडीच्या एका वाड्यात गणपतीची मूर्ती ठेवलेली असे. गणपतीचे अगोदर शारदा-गणपतीच्या मूर्तीचे रंगकाम चालू होत असे. दगडूहलवाईचा गणपती मात्र अकरामारुतीच्या देवळात ठेवला जात असे. दगडू हलवाई दत्त मंदीराच्या जवळ एक चौक होता. तेथे बाहूलीचा हौद होता. तेथे हौदाच्या मागे दगडूशेठ हलवाईचा गणपती बसे. पहिले ३/४ दिवस वगळता साधारण ४/५ दिवसांनंतर आरास पाहण्यासाठी सहकुटुंब माणसे बाहेर पडत. सर्वांची जेवणे आटोपून वाड्यातील मंडळी बाहेर पडत. वडीलधारी माणसे रात्रौ १२.३०-१ चे दरम्यान परत येत. तरुण मंडळी रेंगाळत. लहान मूले-मुली आळीतील सार्वजनिक मंडळाचे तेथे मांडवात खेळत असत. सार्वजनिक कार्यकर्त्यांना ही मूले माहित असत.

त्याकाळी मेळे, पोवाडे, जादूचे प्रयोग, भावगीतांचे कार्यक्रम, शास्त्रोक्त गाण्याच्या बैठकी, मंडळासमोर होत. गजाननराव वाटवे, बबनराव नावडीकर, इ. चे भावगीतांचे कार्यक्रम लोकप्रिय होते. मालती पांडे, पंडीतराव नगरकर, छोटा गंधर्व, जयराम शिलेदार, मास्टर कृष्णराव, इंदिराबाई खाडिलकर, सरस्वती राणे इ. अनेक प्रसिद्ध गायकांचे शास्त्रोक्त गायनाचे कार्यक्रम असत. गोविंदस्वामी आफळे यांचे कीर्तनही लोकप्रिय होते.

पुणे शहराचे त्याकाळी दोन ठळक भाग होते. नव्यापुलापासून सुरू होणारा शिवाजी रस्ता, स्वारगेट चौकापर्यंत होता. शहरात मध्यवर्ती असलेला शिवाजी रोड दक्षिणोत्तर आहे. शिवाजीरोडच्या पूर्व भागात संमिश्र वस्ती होती. तर पश्चिमेकडील सुशिक्षित मध्यम वर्गाची वस्ती होती. पूर्व भागात आराशीवर भर असे. परगावचे लोकही आवर्जून येत. गणेशविसर्जनाच्या आदल्या दिवशी बहुतेक ठिकाणी सत्यनारायणाची पूजा असे. रात्रौ मिरवणुकीसाठी तयारी सुरू होई. गणेश विसर्जनाची मिरवणूक मंडईच्या लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यासमोरील आर्यन टॉकीज जवळून सुरू होई. मला आठवते त्यावेळी आर्यन टॉकीजच्या आवारात एक गोरा सोल्जर खूर्ची टाकून मिरवणूकांवर देखरेख ठेवण्यासाठी बसलेला असे. त्याची आम्हा मुलांना खूप भिती व दरारा वाटे. पुढे स्वातंत्र्यानंतर वातावरण खूपच मोकळे झाले. सकाळी १० ला मिरवणूक सुरू होई. सुरवातीला मानाचे पाच गणपती असत. पहिला मान कसबा गणपती, नंतर जोगेश्वरी, तिसरा भाऊ रंगारी, चौथा तुळशीबाग, पाचवा केसरीवाडा. कसबागणपतीच्या पुढे पुण्यातील पुढारी मंडळी असत. गुलाल उधळून प्रभात ब्रास बँडच्या वादनाने मिरवणूक सुरू होई. ती टिळक पुतळ्यासमोरून फरासखानापर्यंत सरळ येई. तेथे पॅरामाऊंट (आत्ताचे रतन टॉकीज) कडे वळून आप्पा बळवंत चौकात येत असे. तेथून आनंदाश्रम, नू.म.वि. रस्त्याने विश्रामबाग वाड्यावरून सदाशिव पेठ हौदावरून लकडीपूलावर येत असे. लकडीपूलाखाली नदीकाठी त्याचे विसर्जन होत असे. १० वाजता सुरू होणारी मिरवणूक संध्याकाळी समाप्त होई. एका वर्षी मंडईचा गणपती तर दुसऱ्या वर्षी दगडू हलवाईचा गणपती शेवटी अशी आलटून पालटून विभागणी असे. साधारणपणे ८-१० तासात मिरवणूक संपे. मिरवणूक शांततेत पार पडे. आमच्या आळीतील जुन्या जाईच्या गणपतीचे मिरवणूकीत मी लहानपणी सामील होई. आळीतील कार्यकर्ते एकमेकाला ओळखत असत. मला आठवत, एकदा मला बोलावून कार्यकर्त्यांनी 'ए बामणा आरती म्हण' असे गमतीने म्हटले होते. १९६१ सालच्या पानशेत पुरा पर्यंत पुणे शांत होते. २/३ लाखांपर्यंत वस्ती असलेले पुणे शहर पानशेतच्या प्रलयानंतर पूर्णतः बदलून गेले. गेल्या ५० वर्षात पुणे हे शहर न राहता त्याचे महानगरात रूपांतर झाले. ३६ ते ४० लाख वस्ती असलेले हे महानगर अनेक उपनगरात विखुरले गेले. आणि तरीही गणेशोत्सव जवळ आला म्हणजे सर्व महानगर उत्साहाने भरून जाते. शहराच्या मुख्य भागात अगदी पहिल्या दिवसापासून रस्ते गजबजून जातात आणि ४-५ दिवसानंतर गर्दीचा महापूर उठतो. मंडईचा गणपती व दगडू हलवाईचा गणपती हे मुख्य आकर्षण. ८ ते १० तासात

संपणाऱ्या या मिरवणूकीला आता ३६ तास लागतात. गणेशोत्सवाचे स्वरूप बदलले पण पुण्याच्या गणेशोत्सवाचे वैभव आणि वैशिष्ट्य मात्र कायम राहिले. दूरचित्रवाणी आणि नेटवर्क यावर घरबसल्या विसर्जनाची मिरवणूक पहाता येते. तरी तरुण वयात मित्रांच्या समवेत दहा दिवसात संपूर्ण शहर पायी हिंडणे. इराण्याच्या हॉटेलमध्ये चहा पीत, गप्पा मारत बसणे याची सर कशालाच येणार नाही. आठवणीतील गणेशोत्सव आजही तसाच स्मरणात आहे.

**सहवेदना**

भिडे कुलातील ज्ञात व अज्ञात व्यक्तींचे निधन झाले त्यांना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे.
ईश्वर त्यांना चिरशांती देवो ही प्रार्थना !
१) वेदमूर्ती अच्युत लक्ष्मण भिडे, सातारा
२) दिलीप भालचंद्र भिडे, पुणे



# ॥ नर्मदे हर ॥

सौ. अपर्णा शंभो गाडगीळ (भिडे) श्री. शंभो रामचंद्र गाडगीळ,
किर्लोस्कार वाडी, मो. ९८८१२९१५०१ /०२३४६-२२२५९८

सौ. अपर्णा शंभो गाडगीळ ह्या पूर्वाश्रमीच्या कु. रोहीणी यशवंत भिडे ह्यांचे मूळ गांव सांगली असले तरी सुद्धा त्या सोलापूरला राहात होत्या. त्या श्री. शंभो रामचंद्र गाडगीळ ह्या आपल्या पतिसह किर्लोस्करवाडी येथे स्थित आहेत. ह्या उभयतांनी दि. २५ नोव्हेंबर २०१३ रोजी नर्मदा परिक्रमेस पायी सुरूवात केली आणि नुकतीच ती पूर्ण सुद्धा केली आहे. ही परिक्रमा का व कशासाठी. परिक्रमेची सुरूवात कशी करावी तसेच ही परिक्रमा करतांना पाळावयाचे नियम, वाटेमध्ये राहण्यासाठी व भोजनासाठीची व्यवस्था, आणि ही परिक्रमा पूर्ण करतांना आलेले प्रत्यक्ष अनुभव ह्याचे वर्णन ह्या लेखामध्ये त्यांनी केले आहे. नर्मदा परिक्रमा पूर्ण करण्याची इच्छा असणाऱ्यांना ती वास्तवात आणण्यासाठी हे लिखाण प्रेरणादायक ठरेल. अतिशय वाचनीय व उद्‌बोधक लिखाण आपल्याला जरुर आवडेल.

**प्रेरणा व संकल्प** : 'नर्मदा' मैय्याविषयी खूप ऐकले होते, म्हणजे ती सर्व देव, दानवांची तपोभूमी आहे. तिच्या केवळ दर्शनाने सुद्धा पाप नष्ट होते व सात्विक उर्जा मिळते. तिच्या काठी आजदेखील अनेक विभूती आहेत, म्हणून ठरवलं की अशा या भूमीची माती आपल्या मस्तकी लागावी, म्हणून परिक्रमा करण्याचे नक्की ठरविले व तसे घरी बोलूनही दाखविले. यांनीही बरोबर येण्याची तयारी दर्शविली. मुलांचाही सपोर्ट मिळाला. परिक्रमा संपूर्ण पायी होती, होईल तेवढे नियम पाळून करण्याचे ठरविले आणि काय आश्चर्य, संकल्प केल्यावर 'नर्मदेच्या' संदर्भातील पुस्तके, सिडी सहज मिळत गेल्या. नर्मदा पुराण ही वाचनात आले. त्यामुळे आणखीनच ओढ लागली. तसेच श्री. संतोष पेंडसे (कोल्हापूर), माझे नातेवाईक नुकतेच परिक्रमेला जाऊन आल्याने त्यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले. पक्रिमेमध्ये मला नर्मदा काठाचे गुरू भेटावेत अशी इच्छा होती आणि आश्चर्य म्हणजे 'समर्थ श्री राम महाराज' बडवाह यांनी लिहिलेले पुस्तक वाचनात आले. त्यांनी स्वतः तीनदा परिक्रमा केली आहे, असे सद्‌गुरु मला परिक्रमेच्या आधी लाभले व त्यांच्या आशीर्वादाने दि. २५ नोव्हेंबर २०१३ रोजी आमच्या परिक्रमेस सुरुवात झाली.

परिक्रमा म्हणजे काय ? तर मैय्याला आपल्या उजव्या हाताला ठेऊन उगमापासून मुखापर्यत तिच्या प्रवाहाचं उल्लंघन न करता प्रदक्षिणा पूर्ण करणे.

**परिक्रमेत पाळावयाचे नियम :**

१) श्री नर्मदा मैय्याला प्रत्यक्ष देवता मानून तिच्यात अशुद्ध वस्तू टाकू नये. २) मैय्या स्नान करताना साबणाचा वापर करू नये, उपनदी ओलांडताना उदबत्ती लावावी. ३) भोजनामध्ये कांदा, लसूण मसालेदार पदार्थ वर्ज्य. ४) विरक्त वृत्तीने राहावे. कॉट, खुर्चीवर झोपणे बसणे नाही. ५) जास्तीत जास्त वेळ आपल्या उपासनेमध्ये व नामस्मरणात घालवावा. ६) सकाळी व संध्याकाळी आपल्या बरोबर असलेल्या मैय्याची आरती व पूजन करावे. ७) नर्मदा परिक्रमा प्रमाणपत्र जवळ ठेवावे. ८) पुरुषांनी क्षौर करावे. ९) पांढरे वस्त्र साडी अगर ड्रेस, पुरुषांनी पांढरी लुंगी, शर्ट, दंड व कमंडलू.

**परिक्रमेची सुरुवात :**

परिक्रमेची सुरुवात ओंकारेश्वर येथील गोमुख घाटापासून केली, तेथे आपल्याकडून संकल्प करून घेतात व मैय्याचे पाणी एका छोट्या बाटली किंवा कॅनमध्ये पूजा करून आपल्या बरोबर देतात. तेथेच कढई म्हणजे गोड शिरा प्रसाद म्हणून कन्यांचे पूजन करून त्यांना वाटतात व दक्षिणा देतात. मग खऱ्या अर्थाने आपल्या परिक्रमेस सुरूवात होते. हा दक्षिण तट आहे, तेथून उत्तर तट व परत दक्षिण तट.

ओंकारेश्वर - राजघाट - शुलपाणीचे जंगल - रेवा सागर संगम - काठपोर ते मिठीतलाई (साधारण पाच तास लागतात - मोटार लॉचने) समुद्र पूजन होते. नंतर उत्तर तट सुरू होतो. नारेश्वर - तिलकवाडा - कोटेश्वर - माहेश्वर - बडवाह - नेमावर - जबलपूर मार्गे अमरकंटक - माई का बगीचा (जल चढविणे) - परत दक्षिण तट - होशंगाबाद मार्गे हंडिया - परत ओंकारेश्वर - गोमुख घाट ममलेश्वर येथे पाणी चढविणे. परत कढई प्रसाद व कन्यापूजन, परिक्रमा समाप्ती. नंतर ओंकारेश्वरचे दर्शन व माधांताचि परिक्रमा.

नर्मदा परिक्रमेचे एक वैशिष्ट्य म्हणजे केवळ 'नर्मदे हर' या एका शब्दाने परिक्रमा वासियांचे होणारे आदरातिथ्य, त्यात ना जाती भेद ना गरीब श्रीमंत, प्रत्येक व्यक्ती समान पातळीवर मानली जाते. तेथील लोक परिक्रमा वासियांची सेवा म्हणजे मैय्याची सेवा मानून करतात. चहाचा टपरीवाला सर्वांना मोफत चहा, नाष्ता देतो. खूप आग्रहाने त्यांच मन मोडवत नाही म्हणून आधी चहा खूप पिऊन झाला असेल तर किमान पाणी तरी प्यावे, त्यांना बरे वाटते. तेथील लोकांच्यात श्रद्धा आणि सेवाभाव खूपच आढळतो. त्यांना कोणताही प्रश्न विचारा, ते ही सर्व मैय्याची कृपा म्हणतात, कर्तृत्व स्वतःवर घेत नाहीत. तेथील छोटी मुलं तर बोलायला लागल्यावर "नर्मदे हर" पासूनच सुरवात करतात असे वाटते. लोकांच्या घरी कितीही गरीबी असू दे, आदिवासी असू देत, त्यांच्याकडे जे असेल ते जेवण प्रेमाने देतात. मैय्याने कधीच कुणाला उपाशी ठेवलं नाही. कोणत्या न कोणत्या रूपाने येऊन काही ना काही तरी देईल असा अनुभव कित्येकदा येतो. आणि आपण नतमस्तक होऊन जातो. किनाऱ्यावरून जाताना तिला मिळणाऱ्या उपनद्या व नाले ओलांडावे लागतात. तेव्हा पाण्याचा अंदाज येत नाही. अशावेळी कोणी न कोणी येऊन आपल्याला मदत करतात. शेतातून पगदंडीने जात असताना रस्ता चुकण्याची दाट शक्यता असते. तेव्हा ही कोठून तरी कानावर हाक येते, उधर मत जावो, इधर से जावो भटक जावोगे आपला रस्ता चुकत नाही. जंगलातून जातानाही तोच अनुभव. पूर्ण परिक्रमे दरम्यान खूप अवघड किनारे, घनदाट जंगले, २७ कि.मी. ची लक्कडतोडची झाडी, वाटेत काहीही नाही. मांडूगडासारखे अवघड गड उतरणे. मातीच्या खदानाचे रस्ते, खाई असलेली वाट, अवघड व

प्रचंड लांबीचे घाट, प्रचंड पात्र रूंद असलेल्या उपनद्या असे विविध रस्ते पार करत 'नर्मदे हर' च्या घोषात आपण उत्साहाने जात असतो. नवनवीन माणसांचे ग्रुप भेटत असतात. प्रत्येकाच्या चालीचा वेग कमी जास्त असल्याने परत अलग होतात, तीच लोकं परत एखाद्या ठिकाणी भेटतात तेव्हा खूप आनंद होतो.

**आश्रम व्यवस्था** : नर्मदेच्या दोन्ही किनाऱ्यावर अनेक आश्रम आहेत. तेथील महंत परिक्रमवासियांची जेवणाची व राहण्याची अतिशय प्रेमाने सर्व व्यवस्था करतात. एखाद दिवस जास्त राहण्याचा आग्रह असतो. काही आश्रमात परिक्रमा वासियांना ब्लँकेट वा शाली दिल्या जातात. ज्या आश्रमात मनुष्यबळ नसेल तिथे सदावर्त म्हणजे शिधा दिला जातो. जळण दिले जाते. तिथे आपल्याला आपला स्वयंपाक करावा लागतो. काही आश्रम अलिशान असतात तर काही आर्थिकदृष्ट्या खूपच गरीब. त्यांनाच आपण मदतीची हात दिला पाहिजे. तसेच सर्व ठिकाणी पाण्याची व्यवस्था मात्र चांगली आहे. थोड्याथोड्या अंतरावर हातपंप आहेत. जिथे आश्रम व्यवस्था नाही तिथे गावातील मंदिरे अथवा शाळेमध्ये मुक्काम करावा लागतो. पण तिथेही गावातील लोक आपल्या जेवणाची व्यवस्था करतात. आजही नर्मदा किनारी दिव्य विभूती आहेत. त्यांच्या दर्शनाने आपल्याला उर्जा मिळते. किनाऱ्याने जात असतानाही ऋषीमुनींच्या, देवांच्या तपोभूमीत वेगळीच उर्जा जाणवते. आपणही इथे एखादा चातुर्मास करावा असे वाटते. किनाऱ्यावर विविध पक्षी आढळतात. साधना करीत असलेले महंत भेटतात काही ठिकाणी मय्या अतिशय अवखळ, काही ठिकाणी शांत, काही ठिकाणी गूढ व खोल तर काही ठिकाणी प्रचंड वेगाने उंचावरून खाली वाहते. काही ठिकाणी तिचे पात्र प्रचंड रूंद तर उगमापाशी (अमरकंटकला) अतिशय रूंद आहे. अशी विविध रूपे न्याहाळत आपले दिवस कसे जातात कळत नाही. संपूर्ण परिक्रमेत आपण इतक्या लोकांची सेवा घेतो की तिचे ऋण फेडण्यासाठी पुढच्या जन्मी नर्मदा किनारी राहून परिक्रमावासियांची सेवा करावी म्हणजे त्यातून थोडीशी उतराई होईल असे वाटते.

**परिक्रमेतील प्रचलित शब्द** :

नर्मदा - नरबदा, मीठ - रामरंस, मिरची - लंका, पायवाट - पगदंडी, पुरे पुरे - महापुरण, स्त्री - माताराम, पळसाचे झाड - सक्कर का पेड़, वाढा वाढा - न्हाकून न्हाकून, वृद्ध स्त्री - डोकरी, सकाळचा प्रसाद - बालभोग, गावजेवण - भंडारा, स्वयंपाकी - भंडारी, सामानाचा मुख्य - कोठारी, पेरू - बीही, मुलगा - मुडा, ताक - मही

**परिक्रमेकरिता बरोबर आवश्यक साहित्य** :

१) सॅक, स्लीपींग बॅग २) शाल, स्वेटर, कानटोपी, प्लास्टिक कागद ३) अंगावर एक व बॅगेत दुसरा ड्रेस ४) ताट, वाटी, भांडे (पेला), जलासाठी कुपी ५) कानाचा रुमाल, टॉर्च, मेणबत्ती ६) काडेपेटी साबण, वही, पेन, ब्रश-पेस्ट ७) सुई दोरा, औषधे, चाकू ८) नर्मदा मैय्या चा व सद्गुरुंचा फोटो ९) पूजेचे साहित्य, मैय्याचे आसन, कुपिला वस्त्र १०) छायाचित्र असलेले ओळखपत्र ११) दैनंदिन उपासना पुस्तक, जपमाळ १२) दंड, कमंडलु अथवा स्टिलचा डबा.

**रमणीय ठिकाणे** :

१) मांडू गड २) धुवांधार ३) भेडाघाट ४) हापेश्वर ५) नवीन शुलपाणेश्वर मंदिर ६) पारद शिवलिंग व स्फटिक लिंग ७) नेमावर ८) होशंगाबाद ९) मंडलेश्वर १०) कपिलधारा ११) माईका बगीचा १२) सोनमुडा १३) श्री यंत्र मंदिर १४) अमरकंटक चे जंगल

**वैयक्तिक अनुभव** :

मनात केलेली इच्छा मैय्याने पुरवली - एके दिवशी मला रात्री जेवण न करता फक्त लिंबूपाणी प्यायचे होते, म्हणून माझ्या मिस्टरांनी मुक्कामाच्या ठिकाणी गावातील ५/६ दुकानात चौकशी केली पण कोठेच लिंबू मिळाले नाही, ते आश्रमात परत येऊ लागले एवढ्यात एका छोटी परकर पोलकं घातलेली मुलगी मागून पळत आली व म्हणाली बाबाजी बाबाजी आपको लिंबू चाहिये न ये लो, म्हणून एक मोठे व रसरशीत लिंबू देऊन निघूनही गेली.

रतवा या गावात दुर्गा मंदिरात नेपाळी बाबा राहतात. त्यांचे दर्शन घेऊन जावा असे आम्हाला सांगण्यात आले होते. म्हणून संध्याकाळ झाली तरी आम्ही गेलो. मला पाहताच क्षणी ते म्हणाले, मैय्या किती वर्षे वाट पाहावयास लावलीस. आज दर्शन दिलेस म्हणून त्यांच्या डोळ्यातून पाणी येऊ लागले. परत आश्रम सोडून निघतानाही त्यांचे अश्रू (आनंद) थांबेनात.

मानिकपुरा येथे ओंकारानंद महाराजांचा आश्रम दोन दिवसांपूर्वी रस्ता रूंदीत पाडला गेला होता त्यामुळे ते जेवले नव्हते व चिंतेत होते. परंतु आम्ही गेल्यावर त्यांनी स्वतः त्या छोट्या जागेत जेवण बनविले व मैय्याला भोग (नैवेद्य) लावताना म्हणाले, आज तुने मुझे फिर अपनी गोद मे लिया, भुका नही रहने दिया, आजसे फिर मै तेरी सेवा करूँगा, आज तुने मेरी परीक्षा ली असे म्हणून मला प्रेमाने जेवायला वाढले व स्वतःही जेवले.

करौंदी येथील राम मंदिरात 'गोरक्षनाथ' आखाड्याचे साधू शंभूनाथ भेटले, त्यांची नववी परिक्रमा चालू आहे व ते अकरा परिक्रमा पूर्ण करणार आहेत. त्यांच्या सान्निध्यात १५ दिवस होतो. त्यांच्यामुळे अतिशय अवघड किनारे मी पार करू शकले व मी किनाऱ्याने जास्तीत जास्त परिक्रमा करावी अशी नर्मदा मैय्याची इच्छा होती असे वाटले, म्हणून शंभूनाथांची भेट झाली. स्वतः दोन दोन दिवस न जेवूनही किनाऱ्यावर आमच्या जेवणाची पूर्ण काळजी घेत होते. त्यांनी मला माँ नर्मदेची भेट म्हणून एक सुंदर अशी कृष्णाची मूर्ती भेट दिली आहे.

परिक्रमेत डॉ. एम.एल्.श्रीवास्तव, श्री गायत्री उपासक यांचा त्यांच्या आश्रमात लाभलेला सत्संग व गायत्री मंदिरात आम्हाला बसवून दिलेली दिक्षा, जीवनात मनाची साधना कशी करावी ते अन्न भक्षण कोठले करावे असे त्यांच्या कडून बहुमूल्य उपदेश मिळणे व त्या दिवशी तर तुम्हाला पाहून मला अतिशय आनंद झाला आहे असे सांगून स्वतःसाठी आलेला जेवणाचा डबा त्यांनी प्रेमाने आम्हाला जेवावयास दिला व ते स्वतः त्या दिवशी जेवले नाहीत.

हे सर्व पाहिले की वाटते मैय्यानी आपले किती लाड करावेत.

"नर्मदे हर, नर्मदे हर, नर्मदे हर"

# ''श्री समर्थांचा दासबोध''

कै. हरीभाऊ भिडे सांगली ह्यांनी लिहिलेल्या लेखमालेतील लेख.

**शुकासारखे पूर्ण वैराग्य ज्याचे ।**
**वसिष्ठांपरी ज्ञान योगेश्वराचे ॥**
**कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा ।**
**नमस्कार त्या सद्‌गुरु रामदासा ॥**

समर्थांनी बरेच वाङ्‌मय लिहिले आहे त्यामध्ये आत्माराम, दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके, आरत्या वगैरे साहित्य प्रसिद्ध आहे ते सर्व भक्तांच्या रोजच्या पाठांतरामध्ये असते.

श्री समर्थ म्हणतात,

**''आत्माराम दासबोध माझे स्वरूप स्वतः सिद्ध ।**
**असता न मानावा खेद भक्त जनी ॥''**

याच दासबोधातील दशक चवथा समास तिसरा नामस्मरण भक्तीवर आहे. तसेच दशक एकोणिसाव्या समास पहिला यामध्ये समर्थांनी लेखन क्रिया निरूपण केले आहे. नामस्मरण व लेखन क्रिया निरूपण या विषयावर सदरचे लेखात विचार केलेला आहे.

नामस्मरण भक्ती :

**नाम स्मरे निरंतर , ते जाणावे पुण्य शरीर ।**
**महादोषाचे गीरीवर, रामनामे नासती ॥**

नामाचा महिमा अगाध आहे. यज्ञ यागादीच्या साधनांप्रमाणे यात कष्ट नाहीत. नामस्मरण भक्ती सोपी आहे. त्याला वेळेचे बंधन नाही.

श्री वामन पंडीत म्हणतात -

अहो येता जाता, उठता बसता कार्य करिता । सदा देता घेता वदनी वदता घास गिळीता । घरी दारी शय्येवरी, रतिसुखाचे अवसरी । समस्तांची लज्जा त्यजूनि, भगवत् चिंतन करी ॥

श्री गोंदवलेकर महाराज यांचा जन्मच नामात झाला त्याची रामसाधना हीच श्रेष्ठ भक्ती आहे. तसेच संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर माऊली, संत नामदेव महाराज व संत गोरोबा कुंभार यांनी रामनाम महिमा वर्णन केला आहे.

समर्थ म्हणतात, 'नित्यनेमे प्रातःकाळी, माध्यान्हकाळी, सायंकाळी नामस्मरण सर्वकाळी करीत जावे'

मनामध्ये उद्वेग चिंता असतांना मनःशांतीसाठी नामस्मरण हाच एकमेव उपाय आहे.

चांगल्या परिस्थितीत अगर आपद्‌काळी नामस्मरण करावे. नामस्मरणाने विषबाधा, चेडे चेटके यापासून होणारी बाधा टळते.

नामस्मरणाने वाल्याकोळी, वाल्मिक ऋषी झाला. भक्त प्रल्हाद, धृवबाळ नामस्मरणाने पावन झाले. नामाने पाषाण तरले असंख्य भक्त उद्धरून गेले.

काहीच न करीता रामनामाच्या जपाने दुःखाचे पर्वत नष्ट होतात. श्री भगवान शंकर सुद्धा हलाहल विषाच्या तापापासून नामस्मरणाने बचावले. जडमूढ, लहानथोर नामस्मरणाने तरून जातात. नामस्मरण हे तारुण्यकाळी, वृद्धापकाळी, सर्वकाळी व अंतकाळी नियमाने करीत जावे. असा हा नामस्मरण भक्ती महिमा दशक चार, समास तिसरा यामध्ये श्री समर्थांनी सांगितला आहे.

लेखन क्रिया निरूपण

श्री समर्थांनी दशक एकोणीस समास पहिला यात लेखन क्रिया निरूपण केले आहे.

ज्ञानाचा प्रसार करणेचे साधन म्हणजे लेखन क्रियाच आहे. समर्थांचे वेळी छपाईच्या काही सोयी नव्हत्या. सर्व लिखाण हाताने लिहून सांभाळावे लागे, स्पष्ट, सुवाच्च्य अक्षर कसे असावे या बाबीत समर्थ म्हणतात,

''अक्षर वाटोळे सरळ असून त्यावर काने, मात्रा, वेलांट्या नीट काढाव्या. त्याखालचे रेषेस स्पर्श होता कामा नये.''

अक्षर पाहिल्यानंतर वाचकाला समाधान मिळाले पाहिजे. जे लिहिणे आहे ते एकाच आकारांत असावे. ओळीस ओळ लागता कामा नये. तरुणपणी अगदी बारीक अक्षर काढू नये. लिहिण्याचा कागद आखून घ्यावा. ज्याचे वय लहान आहे त्याने जपून लिहावे. पूर्वीच्या काळी बोरूची लेखणी करावी लागत असे शाई तयार करावी लागत असे. आता सर्व साहित्य उपलब्ध आहे. त्यामुळे हल्ली लेखन क्रिया अवघड राहिलेली नाही. पूर्वीच्या काळी पुस्तके बांधून घेण्याची पद्धती नव्हती. लेखन झालेली पाने सुटी असत. ती बासनात नीट बांधून ठेवावी लागत.

''नाना गोप नाना बासने, मेण कापडे सिंदूरवर्णी, पेट्या कुलपे जपणे, पुस्तका कारणे'' पण आता सर्व सोयी आहेत.

अशी ही लेखन क्रिया समर्थांनी निरूपण केली आहे.

समर्थांचा काळ फार जुना आहे, समर्थांनी लेखन क्रियेसंबंधी केलेल्या सूचना त्यावेळी फारच महत्वाच्या होत्या.

**श्री. मिलींद भिडे, सांगली**
**मो. ९४२११२३००३**

## दिलगीरी

'आम्ही भिडे' मुखपत्र क्र. १९ मध्ये पान क्र. ६ वर 'आपले सरकार आहे खरे कलाकार' ही कविता सौ. प्रिती भिडे यांची असून त्याखालील 'भ्रमंती' ही कविता कु. वैभवी भिडे (डोंबिवली) हीने लिहिलेली आहे. अनानवधानाने कु. वैभवीचे नावाचा उल्लेख झाला नाही त्याबद्दल क्षमस्व !

- कार्यकारी संपादक

## सुमनांजली !



वेदमूर्ती, अच्युत लक्ष्मण उर्फ आप्पा भिडे (गुरूजी) यांचे दि. ३०-५-२०१४ रोजी त्यांचे राहत्या घरी वृद्धापकाळात वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले व सातारा येथील जुन्या पिढीतील वैदीक रत्नांमधील शेवटचा तारा निखळला.

आप्पांचा जन्म १९३० साली संगम माहूली (सातारा) येथे भिक्षुक घराण्यात झाला. वयाच्या ६ व्या वर्षापर्यंतच मातृपितृछत्र हरपले. वडील बंधू कै. वासुदेवशास्त्री भिडे व वहिनी सौ. राधाबाई भिडे यांनी त्यांना पितृप्रेम व मातृप्रेम दिले. शालेय शिक्षण बेताचेच होऊ शकले व वेदाध्ययनसुद्धा अगदी आवश्यक तेवढेच. त्यामुळे सुरूवातीला तरूणपणी कोठे छापखान्यात, पंचे-टॉवेलच्या मिलमध्ये तर कधी तंबाखू-जर्दा कारखान्यात मिळेल तशी नोकरी करीत राहिले. त्या काळी वैदिक व्यक्तींची प्रचुरता असलेने केवळ भिक्षुकीवर उदरनिर्वाह चालविणे फार कठीण होते. तशातही होत्या त्या शेत जमिनी कुळकायद्यात गेल्या व हक्काची तोंडची भाकर हिरावली गेली. आयुष्यात बरेच कडू अनुभव घेतल्यावर वडील भावाने दिलेल्या सल्ल्यानुसार वेदाध्ययन पूर्ण केले. आणि पूर्णवेळ भिक्षुकीस वाहून घेतले. आजन्म ब्रह्मचारी राहून भावाचा संसार हाच स्वत:चा संसार समजून जीवन व्यतीत केले. भिक्षुकीकडे व्यवसाय म्हणून न पाहता अडल्या-नडल्यांना वेळोवेळी मदत केली. भिक्षुकीस समाजात योग्य ती प्रतिष्ठा व सन्मान मिळेल यासाठी कार्य करीत राहिले. व्यक्तीगत प्रसिद्धी मिळविण्यापासून दूर राहिले. अनेक जणांना विद्यादानाने मदत करून त्यांचे संसार वसविले.

आप्पांचे वडिलबंधूचा संसार फार मोठा. वडील बंधुना दोन मुले व सहा मुली परंतु आज मितीला सर्व परिवार सुस्थळी आहेत. प्रत्येकाचे संसाररूपी वृक्ष छान बहरलेले आहेत. याचे सारे श्रेय आप्पांच्या त्यागाला आहे यात तिळमात्र अतिशयोक्ती नाही. आप्पांना वेदाचे धडे वडीलबंधूकडून मिळाले. शिवाय त्यांना कै. पां.रा. उर्फ कॅप्टन भिडे (सातारा) हे गुरू म्हणून लाभले ज्यांच्यामुळे त्यांना जीवनात स्थिरता लाभली.

मुंडाजे येथील भिडे कुलसंमेलनात ज्येष्ठ व्यक्तींमध्ये आप्पांचा सत्कार केला गेला तसेच 'आम्ही भिडे' (प्राजक्त)च्या एका अंकाचे प्रकाशनसुद्धा सातारा येथे त्यांच्या हस्ते करण्यात आले. आप्पांना तरूणपणी व्यायामाची आवड होती, कुस्तीचा शौक होता. परंतु घरच्या परिस्थितीमुळे त्यात मनासारखी प्रगती साधता आली नाही.

आप्पांच्या जाण्याने त्यांच्याशी जोडलेल्या अनेक घरांचे, व्यापारी, शिष्य, मित्रांचे व आम्हा कुटुंबियांचे न भरून येणारे नुकसान झाले आहे. निस्वार्थी भावनेने इतरांसाठी झिजणारे व्यक्तिमत्व हरपले.

ईश्वर त्यांचे आत्म्यास सद्गती देवो.

## दातृत्व



डॉ. शीला प्रदीप भिडे व श्री. प्रदीप वासुदेव भिडे

ज्या मातापित्यांनी आपणांस लहानपणापासून शिक्षणाकरिता सतत पाठीशी उभे राहून प्रोत्साहन दिले. अशा मातापित्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या शैक्षणिक निधीकरिता श्री. प्रदीप वासुदेव भिडे (IAS) आणि त्यांच्या पत्नी डॉ. सौ. शीलाताई प्रदीप भिडे (IAS) सध्या रा. दिल्ली या दाम्पत्याने मागील वर्षी रु. ५ लाख सुपूर्द केले होते. त्याप्रमाणे जानेवारी २०१४ मध्ये रत्नागिरीच्या कु. समिधा भिडे हिला रु. १०,०००/- शैक्षणिक मदत म्हणून दिलेले आपणांस माहितीच आहे. आम्हाला सांगण्यास आनंद वाटतो की, ह्या वर्षी पुन्हा ह्या दाम्पत्याने रु. १० लाख शैक्षणिक निधीसाठी दिले आहेत.

भिडे कुलोत्पन्नातील गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या गरजू विद्यार्थी/विद्यार्थिनी शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी ही मदत आहे. या कायमस्वरूपी शैक्षणिक निधीच्या येणाऱ्या व्याजातून ही मदत गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी करावी असे ह्या दाम्पत्याने सुचविलेले आहे. गरजू आणि गुणवत्ता प्राप्त तसेच शालेय अथवा महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थिनींनी प्रतिष्ठानकडे त्वरीत अर्ज करावेत.

शिक्षण घेणारा विद्यार्थीवर्ग आर्थिक ओढाताणीमुळे शिक्षणापासून वंचीत राहू नये हा उदात्त व विशाल दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून या दाम्पत्याने सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले आहे. धन्य ते माता-पिता की ज्यांनी जन्म दिला आहे आणि अशा विचारांचे संस्कार यांच्यात रूजविले.

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा.**

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**

**पुणे कार्यालय :**

९२, शुक्रवार पेठ, रंजन को-ऑप. हौसिंग सोसायटी,

मंडई गणपतीजवळ, पुणे ४११००२.

फोन : दिलीप भिडे - मो. ९६५७५४१२३६

● **पत्रव्यवहारासाठी पत्ता** ●

**ले.क. सुनिल वासुदेव भिडे**

१४२६, सदाशिव पेठ, निलसदन ए-२०१,

पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०.

मो. ९६२३०१७४४४




## - शिष्यवृत्ती -

भिडे कुलातील गरजू व हुषार तसेच शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ''प्रदीप व शीला भिडे शैक्षणिक निधी'' मधून भिडे प्रतिष्ठानकडून शैक्षणिक आर्थिक मदत / शिष्यवृत्ती सुरू केलेली आहे. इच्छुकांनी आपले अर्ज नांव/पूर्ण पत्ता/संपर्क क्रमांक/शिक्षण अर्हता आणि पालकांचे उत्पन्नासह माहिती प्रतिष्ठानच्या पत्रव्यवहाराकरिता असलेल्या पत्त्यावर त्वरीत पाठवावे. सदरहू शिष्यवृत्ती विना परत फेडीची आहे.

प्रकाश प्रकाशनाचे हे साप्ताहिक प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७, 'डी' वॉर्ड, गंगावेस, कोल्हापूर येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.
मालक, संपादक, प्रकाशक : श्री. प्रफुल्ल डबीर
(या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
RNI No. M-6 (1457)/70-RNI

साप्ताहिक प्राजक्त
२८७, 'डी'वॉर्ड, कसबा गेट
गंगावेस रोड, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१-२५४०४२७

